Special Issue- March 2019
An International Multidisciplinary Refereed Research Quarterly Journal
ISSN No. 2319 - 5908

शोध संदर्श

# शोध संदर्श

# SHODH SANDARSH

शिक्षा, साहित्य, इतिहास, कला, संस्कृति, विज्ञान, वाणिज्य आदि

Chief Editor :
Dr. V.K. Pandey

Editor :
Dr. V.K. Mishra
Dr. V.P. Tiwari

UGC Approved
UGC
No.-41329

JOURNAL IMPACT FACTOR
SJIF
No. 4.713

GENERAL IMPACT FACTOR
GIF
No. 1.4293

## विशेषांक

विविध ज्ञान - विज्ञान - विषय का मन्थन एवं विमर्श ।
नव - उन्मेषी दशा - दिशा से भरा 'शोध - सन्दर्श' ।।

**Editor Board for Special Issue**

| | | |
|---|---|---|
| **Dr. S. R. Kattimani** | **Dr. Shruti Joshi** | **Dr. M.S. Ghorpade** |
| Dept. of History | Dept. of English | Dept. of History |
| **Prof. D. A. Pawar** | **Dr. Prabhavati . A. Patil** | **Prof. B. K. Gosavi** |
| Dept. of Pol. Sci | Dept. of English | Dept. of Marathi |
| **Dr. A. S. Mahat** | **Dr. Neeta Patil** | |
| Dept. of Hindi | Librarian | |


The editors and editorial board with great pleasure place before the readers the 22nd issue of seventh volume of Shodh Sandarsh, An International Multidisciplinary Refereed Research Quarterly Journal. (U.G.C-Listed No-41329, Impact Factor – 4.7 (www.sjifactor.com) ISSN-2319-5908).

The research contributions by the participants have made the journal enrich with resources. The timely publication of journal was the collective efforts of our editors, editorial board and the technical staff. The journal has diversified ares covered under its ambit giving maximum option for the research scholars. We expect continued contributed contribution from everyone.

**Disclaimer:**

The views in the journal are those of authors and not the publisher or the editorial board. The readers are informed , authors, editors or the publisher don not owe any responsibility for any damage or loss to any person for the result of any action taken on the basis of the work. The articles/ Papers published in the journal are subject to copyright of the publisher. No part of the publication can be copied or reproduced without the permission of the publisher.

**Published by:**

Principal ,

Vivekanand College (Autonomous), Kolhapur

Cost Rs. 550/-

## अनुक्रमणिका


| Sr. No | Name of Research Scholar | Title of Paper | Page no. |
|---|---|---|---|
| 27 | प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम | 'अरुणा असफअली यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान' | 98 |
| 28 | प्रा. डॉ. झाकीरहुसेन हाकीम संदे | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील मुस्लीम स्त्री : कुलसुमबेन सयानी | 101 |
| 29 | डॉ. राज पी. चव्हाण<br>प्रा. शोभाताई एस. पाटील | राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | 103 |
| 30 | डॉ. ज्योती ज. व्हटकर | 1942 चा स्वातंत्र्य लढा व यशवंतराव चव्हाण | 108 |
| 31 | कु. प्रियांका भिमराव पोवार | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्री-स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान | 110 |
| 32 | डॉ. मधुकर खंडू पवार | वैयक्तिक सत्याग्रह १९४० चा लढ्यातील स्त्रीयांचे योगदान | 113 |
| 33 | प्राचार्य, डॉ. घोलप सर्जेराव देवाप्पा | ज्ञानसुर्य शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शिक्षण क्षेत्रातील मौलीक कार्य | 115 |
| 34 | दुरगुडे एस. पी. | महात्मा गांधीचे तत्वज्ञान आणि स्वतंत्र्यासाठी संघर्ष असहकार चळवळ | 117 |
| 35 | डॉ. शारदा गोविंदराव बंडे | भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये महाराष्ट्रातील क्रांतीकारक | 119 |
| 36 | डॉ. वरेकर निवासराव अधिकराव | 1942 ची चलेजाव क्रांती आणि सातारा | 122 |
| 37 | डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मुस्लिम महिलांचे योगदान | 126 |
| 38 | Dr. Khot Madhuri Rajaram<br>Dr. Kavita Gagrani | वारणा विभागाचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | 130 |
| 39 | प्रा. एस. वाय. पाटील | भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यातील शेतकरी चळवळीचे योगदान | 132 |
| 40 | प्रा. डी. ए. पवार | भारतीय स्वातंत्र्यलढा व कामगार चळवळ | 135 |
| 41 | डॉ.डी.व्ही.सुर्यवंशी<br>प्रा.सौ.शुभांगी सुखदेव माने–पाटील | महाराष्ट्रातील कामगार चळवळ नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीमधील योगदान | 138 |
| 42 | प्रा.डॉ.सपकाळ रामेश्वर विक्रम | 'सुभाषचंद्र बोस यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान' | 141 |
| 43 | प्रा. भागवत वसंत बजरंग | स्वातंत्र्यसंग्रामाच्या संघर्षातील अग्रदूत: क्रांतिवीर रंगरावदादा विठ्ठलराव पाटील | 144 |
| 44 | प्रा. अमृता आनंदराव दिंडे | 'स्वातंत्र्यसेनानी दुर्गाबाई देशमुख यांच्या कार्याचा चिकित्सक आढावा' | 147 |
| 45 | डॉ.मधुकर विठोबा जाधव | भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यवीरांगना वीणा दास | 151 |
| 46 | डॉ.तानाजी रामचंद्र हवलदार | चंपारण्य सत्याग्रह | 154 |
| 47 | प्रा. बाबली गंगाराम गावडे | गांधीयुगातील निर्णायक लढे : एक अभ्यास | 156 |
| 48 | Dr. Girish P. Vaghela | भारतीय स्वातंत्र्य संग्राम और गुजरात के बुनियादी कार्यकर : पडकार एवं व्यूहरचना | 159 |
| 49 | डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले. | मणिपूरची क्रांतीकारक राणी गैडीनलू | 163 |
| 50 | प्रा.गीतांजली श. साळुंखे | डॉ.बापूजी साळुंखे यांचे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील योगदान | 165 |
| 51 | प्रा. वाय. ए. आवळे | स्वातंत्र्यपूर्व संस्थानकालीन मल्लविद्या व इतर खेळांचा विकास | 167 |
| 52 | Rinkal J. Vaghela | आज के सन्दर्भ में गांधीजी के विचारों की प्रस्तुतता | 170 |
| 53 | प्रा. डॉ. धीरज सुरेश शिंदे | काकासाहेब चव्हाण यांचे कार्य व शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे | 172 |
| 54 | सौ. रश्मी शिवाजी आडेकर | उपेक्षित पण निष्काम कर्मयोगी : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे | 175 |
| 55 | Dr. KOLASEKAR MANOHAR | '1857 च्या उठावाचा रेल्वेवर झालेला परिणाम' | 177 |
| 56 | डॉ. शर्मिला अशोक साबळे | महात्मा गांधीचे अहिंसावादी तत्त्वज्ञान व असहकार चळवळ | 179 |
| 57 | श्रीमती सरकाळे तेजश्री तानाजी | 1935 चा भारत सरकारचा कायदा –एक ऐतिहासिक आढावा | 181 |
| 58 | श्री महेशकुमार पांडुरंग सोनावणे | स्वातंत्र्यसेनानी शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे | 184 |
| 59 | विवेकानंद माने. | क्रांतिविरांगणा विजयाताई लाड –प्रतिसरकारातील एक जिव्हार महिला | 186 |
| 60 | प्रा. चामे एच. व्हि. | भारतीय समाजसुधारणा व संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | 188 |

# 1935 चा भारत सरकारचा कायदा –एक ऐतिहासिक आढावा

श्रीमती सरकाळे तेजश्री तानाजी
संशोधक विद्यार्थी
मो. नं. 9673753639

**सारांश –** 1935 च्या कायद्याने भारताला घटनात्मक सुधारणा देण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केले. वास्तविक पाहता या कायद्याने ब्रिटिश सरकारचे वर्चस्व निर्माण झाले प्रांतिक स्वायत्तता नावापुरतीच राहिली या कायद्यानुसार भारतात निवडणुका झाल्या. काँग्रेसने आपले वर्चस्व सिद्ध करून दाखविले. भारतीय संविधान निर्मिती मध्ये या कायद्याला विशेष महत्त्व आहे. थोड्या फार बदलाने या कायद्यातील बहुतांश तरतुदी भारतीय संविधानामध्ये स्वीकारण्यात आल्या आहेत. प्रत्यक्षात कायदा अंमलात येण्यापूर्वीच अनेक प्रश्न निर्माण झाले होते. 1939 च्या दुसऱ्या महायुद्धामुळे या कायद्याची यशस्वी अंमलबजावणी झाली नाही. तसेच कायद्यामध्ये अनेक विसंगत बाबी असल्याने काँग्रेसने देखील याला विरोध दर्शविला होता.1935 चा कायद्याने संघ न्यायालय, प्रांतिक कायदेमंडळ,शासकीय खात्यांची विभागणी, रिझर्व बँक ऑफ इंडिया इत्यादी गोष्टी अस्तित्वात आल्या. काँग्रेसमध्ये फूट पाडण्याची सरकारी रणनीती ब्रिटिशांची या कायद्यामुळे स्पष्ट दिसून येते. वास्तविक सत्ता साम्राज्यवाद्यांच्या हाती होती. 1935 चा कायदा भारतीय स्वातंर्त्यलढयातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो.

**प्रस्तावना –** भारताच्या घटनात्मक इतिहासात महत्त्वपूर्ण असलेल्या अनेक कायद्यांमध्ये 1858 पासून ते 1947 पर्यंतच्या विविध कायद्यांचा समावेश होतो. साम्राज्यवाद्यांनी भारताबाबत अंगिकारल्या 'फोडा व राज्य करा' या परंपरागत कूटनीतीचा अविष्कार त्यांच्या सर्वच कायद्यामधून स्पष्टपणे प्रतिबिंबित होतो.[1] 1932–33 मध्ये सरकारने सर्वसामान्यांची चळवळ यशस्वीपणे दडपून टाकली. अशा प्रकारच्या चळवळी पुन्हा आणि अल्पकाळातच प्रभावीपणे उभे राहू नये, यासाठी सरकारला कोणतेही प्रतिबंधात्मक कारवाई करणे शक्य नव्हते. ब्रिटिश सरकारने चळवळीचे खच्चीकरण करून कायमची दुबळी बनविण्याची योजना आखली. यातच घटनात्मक सुधारणांचा पुढील टप्पा देण्याचा निर्णय घेण्यात आला. ऑगस्ट 1935 मध्ये ब्रिटिश संसदेने '1935 चा भारत सरकारचा कायदा' मंजूर केला. या कायद्याला भारताच्या घटनात्मक इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय संविधानामध्ये या कायद्यातील महत्त्वाच्या बाबींचा समावेश केल्याचे दिसून येते. या कायद्याने भारतीय प्रांत व भारतीय संस्थाने यांचे मिळून अखिल भारतीय संघराज्य स्थापन झाले.

**उद्दिष्टे –** भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण कायद्यांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून आढावा घेणे. तसेच 1935 चा भारत सरकारच्या कायद्यावर थोडक्यात प्रकाशझोत टाकणे.

**व्याप्ती –**प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती 1935 ते 1939 या कालखंडातील आहे यामध्ये 1835 च्या कायद्यातील विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. तसेच कायद्याचे भारतीय संविधान स्वातंर्त्यलढ्यातील योगदानाचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

**संशोधन पद्धती व साधने –**प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे तसेच दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**विषय विवेचन –** 1919 चा कायदा हिंदी नेत्यांना अपुरा व असमाधानकारक वाटला म्हणून या सुधारणांवर समाधान न मानता भारतात राष्ट्रीय स्वातंर्त्याची चळवळ स्वातंर्त्याची चळवळ सुरू ठेवली. या कालखंडात 1935 च्या कायद्याची पार्श्वभूमी तयार होत गेली. या घटना घडत असतानाच हिंदुस्थानची भावी घटना कशी असावी याविषयी खूप चर्चा झाली. कॉंग्रेस, लीग व इतर संघटना यांच्यात एकमत झाले नाही. या परस्परविरोधी मागण्यांचा ब्रिटिशांनी फायदा घेतला. परिणामी सुधारणा देताना त्यांनी हातचे राखून दिल्या [2]

**1935 च्या कायद्याची पार्श्वभूमी–** 1933 मध्ये हिंदुस्थान मध्ये हिंदुस्तान ला सुधारणा देण्यासाठी एक श्वेतपत्रिका निघाली. श्वेतपत्रिकेवर आधारित कायदा बनवण्यासाठी लॉर्ड लिनलिथगो यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. यांनी आपला अहवाल 21 नोव्हेंबर 1934 रोजी सरकारला सादर केला. या अहवालाच्या आधारे भारत मंत्री सॅम्युअल होअर यांनी 5 फेब्रुवारी 1935 रोजी कनिष्ठ सभाग्रहात बिल मांडले. मजूर पक्षाने याला विरोध करून हिंदुस्तानला जास्तीत जास्त अनुकूल सुधारणा देण्यासाठी, तर हुजूर पक्षाने प्रतिकूल सुधारणा देण्यासाठी अनेक दुरुस्त्या सुचविल्या. त्याचप्रमाणे काही बदल करून शेवटी 6 जून 1935 रोजी बिलास दोन्ही सभागृहांची अंतिम मान्यता मिळाली. 2 ऑक्टोबर 1935 रोजी इंग्लंडचा राजा ची सही होऊन या बिलाचे '1935 चा भारत विषय कायद्यात'रूपांतर झाले.[3]

**1935च्या कायद्याची वैशिष्ट्ये–**

**1) एक संघराज्य निर्मिती –** 1935 च्या कायद्यात एकूण प्रकार एकूण 14 प्रकरणे प्रकरणे असून 321 कलमे आणि त्याला 12 परिषद 10 परिशिष्टे जोडलेली आहेत.[4] या कायद्याच्या दुसऱ्या प्रकरणात संघराज्याची मध्यवर्ती सत्ता आणि तिचा कारभार यांच्याविषयी तरतूद आहे. ब्रिटिश भारतातील प्रांत व संस्थाने यांचे मिळून संघराज्य निर्माण करण्याची तरतूद करण्यात आली. यात प्रांतांना समान दर्जा नव्हता, संस्थानिकांनी सामील व्हायचे की नाही याबाबत निर्णय संस्थानिकांवर ठेवण्यात आला होता. ब्रिटिश सम्राटाचा प्रतिनिधी या नात्याने व्हाईसरायने भारतीय संस्थानिकांशी संबंध ठेवायचे होते.[5]

**2) केंद्रीय कायदेमंडळ –** केंद्रीय कायदे मंडळ द्विग्रही करण्याची तरतूद करण्यात आली. वरिष्ठ सभागृहात प्रांताचे 156 व संस्थानांचे 104 असे एकूण 260 सदस्य तर कनिष्ठ सभाग्रहात प्रांताचे 250 व संस्थानिकांचे 125 असे 375 सदस्य असतील. प्रांताचे सदस्य सर्वसाधारण वर्गीय, जातीय या मतदारसंघातील लोकांकडून निवडले जाणार होते. तर संस्थानिकांचे प्रतिनिधी संस्थानिकांकडून नियुक्त केले जाणार होते. कनिष्ठ सभागृहाची मुदत पाच वर्षे तर वरिष्ठ सभागृहातील एकतृतीयांश सदस्य दर तीन वर्षांनी निवृत्त होऊन त्या ठिकाणी नवीन सदस्य निवडले जाणार होते.[6].

**3) खाते विभागणी –** केंद्र व प्रांत यांच्यामध्ये खाते विभागणी करण्यात आली. मध्यवर्ती सरकारची खाती, प्रांतिक सरकारचे खाती, समवर्ती यादी या तीन गटात विभागणी करण्यात आली. अखिल भारतीय दृष्टिकोनातून महत्त्वाची खाती मध्यवर्ती सरकारकडे सोपवण्यात आली. उदा.परराष्ट्र व्यवहार, संरक्षण इ. 59 खात्याचा समावेश यात करण्यात आला. कमी महत्वाची परंतु स्थानिक दृष्ट्या महत्त्वाची खाती उदा. शिक्षण, आरोग्य इत्यादी 54 खात्यांचा समावेश प्रांतिक सरकारच्या खात्यात करण्यात आला. समवर्ती यादीमध्ये पाटबंधारे वीज पुरवठा इत्यादी 36 खात्यांचा समावेश करण्यात आला. केंद्र व प्रांतिक सरकारला समवर्ती सूचीत असलेल्या विषयांबाबत कायदे करण्याचा अधिकार होता. दोहोंमध्ये विसंगती निर्माण झाल्यास केंद्राचा कायदा अंतिम मानण्याची तरतूद स्पष्ट करण्यात आले.[7]

द्विदल राज्यपद्धती –1919 च्या कायद्याने प्रांतात लागू करण्यात आलेली द्विदल राज्यपद्धती या कायद्याने रद्द करून या पद्धतीचा स्वीकार केला. मध्यवर्ती खात्याचे राखीव व सोपीव असे विभाजन करण्यात आले. राखीव खात्यांचा तीन अधिकार्यांच्या कार्यकारी मंडळाच्या साह्याने तर सोपीव खात्यांचा कारभार निर्वाचित सदस्यतील दहा सदस्यांचे करून पहावयाचा होता.

कायदेमंडळाचे अधिकार – या कायद्याने प्रांतात संपूर्ण जबाबदार राज्यपद्धती, केंद्रामध्ये अल्पांशाने जबाबदार राज्यपद्धती कायदेमंडळाच्या अधिकार वाढले. तरी या अधिकारावर अनेक निर्बंध होते. काही विषयांवावत हिंदी कायदेमंडळाला कायदे तसेच सभागृहात बिल मांडण्यापूर्वी गव्हर्नर जनरलची परवानगी घ्यावी लागेल. केंद्रीय कायदे मंडळाचे अंदाजपत्रकावर अंदाजपत्रकातील20% भाग संमतीसाठी कायदेमंडळ पुढे ठेवला जात असे. तसेच कायदे मंडळाने पास केलेल्या नकार देण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल होता.

6) संघराज्याचे न्यायालय– या कायद्याने संघराज्याचे सर्वश्रेष्ठ न्यायालय – फेडरल कोर्टाची स्थापना करण्याचे ठरविण्यात आले. मध्ये फेडरल कोर्टाची स्थापना झाली. यात एक सरन्यायाधीश व सहा इतर न्यायाधीश आहेत. त्यांची नेमणूक इंग्लंडच्या करण्यात. या न्यायालयाची संघराज्यातील सर्व न्यायालयांवर हुकूमत चालेल. व्हाईसरायला कायदेविषयक मार्गदर्शन करण्याचा अधिकार या न्यायालयाला देण्यात आला.

7) सल्लागार मंडळाची निर्मिती – 1858 मध्ये भारतमंत्र्याला सल्ला देण्यासाठी निर्माण झालेले भारत मंडळ रद्द होऊन त्याऐवजी 3ते 6 सदस्यांचे सल्लागार मंडळ नेमले. ज्यांना हिंदुस्थानातील राज्यकारभाराचा कमीतकमी 14 वर्षे अनुभव आहे व भारत सोडून दोन वर्षापेक्षा जास्त काळ झालेला नाही, अशांची नियुक्ती सल्लागार मंडळावर करावे,असे ठरले.

8) व्हॉईसरायचे अधिकार व जबाबदाऱ्या – सरकार प्रमुख या नात्याने व्हाईसरॉयला खास अधिकार दिले होते. देशाच्या शांततेत व सुरक्षित सुव्यवस्थित सुव्यवस्थेस धोका निर्माण होऊ न देणे.आर्थिक स्थैर्य दाखवून देशाची पत संभाळणे. कायदेमंडळाचे निर्णय धुडकावून लावणे, वटहुकूम याद्वारे हवा तो कायदा मंजूर करण्याचा अधिकार व्हाईसरॉयला होता. यासंदर्भात डॉ. किथ म्हणतो,'अल्पसंख्यांकाच्या नावाखाली या कायद्याने जबाबदार शासनपद्धतीला हरताळ फासला होता.'8

9) प्रांतीय स्वायत्तता – प्रांतातील द्विदल शासन पद्धती नष्ट करून संपूर्ण कारभार कायदेमंडळातील मंत्रिमंडळाकडे सोपविला. जोपर्यंत कायदेमंडळाचा मंत्रिमंडळावर विश्वास आहे, तोपर्यंत गव्हर्नरला राज्यकारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता. याचा अर्थ प्रांतामध्ये या कायद्याने संपूर्ण जबाबदार शासनपद्धती निर्माण केली असा नाही. कारण व्हाईसरायला केव्हाही शांतता व सुव्यवस्थेच्या गोष्टीवरून सत्ता आपल्या हाती घेता येऊ शकत होती.

10) राज्य पुनर्रचना – या कायद्याने सिंध प्रांत मुंबईपासून प्रांत बिहार पासून वेगळा करण्यात आला. त्यामुळे 1937 पर्यंत हिंदुस्थानात 11 मोठे प्रांत व 6 कमिशनरच्या ताब्यातील प्रांत अशी घटकराज्य निर्माण झाली. या कायद्याने ब्रह्मदेश हिंदुस्तान पासून वेगळा करण्यात आला.

11) इतर तरतुदी – या कायद्याने रेल्वे मंडळाची स्थापना करण्यात आली. तसेच चलन व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे, नोटा छापणे, बँकांवर ताबा ठेवणे, सरकारची बँक म्हणून काम पाहणे इत्यादी कामासाठी या कायद्याने 'रिझर्व बँक ऑफ इंडियाची' स्थापना करण्यात आली. वरिष्ठ सरकारी नोकर निवडण्यासाठी एक मध्यवर्ती लोकसेवा आयोग मंडळ नेमले व अशाच प्रकारचे मंडळ नेमण्याचा अधिकार प्रांतांना दिला. पूर्वी हे काम भारत मंत्री करत असे [9].

1935 च्या कायद्याची अंमलबजावणी – या कायद्याच्या अंमलबजावणीची पावले सरकार उचलणार हे हे उघड असतानाच 12 एप्रिल 1936 च्या लखनौ अधिवेशनात पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली निवडणुकात सहभागी होण्याचा ठराव बहुमताने संमत झाला. या निवडणुकांमध्ये काँग्रेसला भरघोस यश मिळाले. 1585 पैकी 711 जागा काँग्रेसला मिळाल्या. बहुमत मिळालेल्या प्रांतात सरकार स्थापन करायचे की नाही याबाबत काँग्रेसमध्ये भिन्न विचार होतो. या दोन्ही गटांना एकत्रित आणून महात्मा गांधीजींनी त्यांच्यात समन्वय घडवून आणला .परिणामी 30 मार्च 1937 रोजी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने मंजूर केलेल्या ठरावान्वये काँग्रेसला सरकार स्थापन करण्याची परवानगी दिली. काँग्रेसने आपले सरकार स्थापन केले. मुस्लिम लीगला आपल्या मंत्रिमंडळात स्थान दिले गेले नाही. यातूनच दोन्ही पक्षात कटुता वाढत गेली. बॅरीस्टर जीनांनी काँग्रेस विरोधात वक्तव्य करण्यास केली.

3 सप्टेंबर 1939 रोजी इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध घोषणा करताच त्याच दिवशी व्हाईसराय लॉर्ड लिनलिथगो याने भारतीय नेत्यांना विश्वासात न घेता एका पत्राद्वारे भारतालाही इंग्लंडच्या बाजूने युद्धात खेचले याला विरोध म्हणून 14 सप्टेंबर 1939 रोजी वर्धा येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत इंग्लंडने आपली भूमिका आणि युद्ध हेतू स्पष्ट केल्याखेरीज काँग्रेस इंग्लंडला पाठिंबा देऊ शकणार नाही, असा ठराव पास करण्यात आला. 17 ऑक्टोबर 1939 रोजी भारत विषयक धोरण जाहीर केले जागतिक शांतता व लोकशाही व्यवस्था टिकवणे हा इंग्लंडचा युद्ध हेतू असून भविष्यात भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्याचा ब्रिटिश सरकारचा हेतू आहे. असे जाहीर केले. 23 ऑक्टोबर 1939 रोजी वर्धा येथे भरलेल्या बैठकीमध्ये ब्रिटिश धोरणाचा निषेध म्हणून केंद्रीय व प्रांतिक कायदेमंडळांमधून सर्वांनी राजीनामे दिले. सहाजिकच त्या आठ प्रांतामध्ये गव्हर्नरची अनियंत्रित सत्ता प्रस्थापित झाली.

1935 या कायद्याचे मूल्यमापन /परीक्षण – या कायद्याने सर्वसाधारण परिस्थितीत प्रांतामध्ये संपूर्ण जबाबदार राज्यपद्धती सुरू केली व केंद्रामध्ये द्विदल राज्यपद्धती सुचविली म्हणून हिंदुस्थानच्या घटनात्मक प्रगतीच्या काळात हा कायदा अत्यंत महत्त्वाचा आहे

1)भारतात जबाबदार शासनपद्धती निर्माण केली नाही. हिंदी लोकांचे राज्यकारभारावर कसलेही नियंत्रण प्रस्थापित होऊ शकले नाही.

2) प्रांतातील द्विदल पद्धत यशस्वी झाली नसतानादेखील केंद्रात ती सुचविली गेली

3) या कायद्याने संघराज्य एकूण लोकसंख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त लोकसंख्येची संस्थाने संघराज्यात सामील झाल्यावरच अस्तित्वात येणार होती. परंतु संस्थानिकांचे सामीलीकरण ऐच्छिक होते. सहाजिकच संस्थानिकांनी फारशी उत्सुकता दाखवली नाही त्यामुळेच या कायद्याप्रमाणे भारतात संघराज्य कधीच अस्तित्वात येऊ शकले नाही

4) संस्थानिकांचे प्रतिनिधी संस्थानिकांकडून निवडले जाणार असल्याने जनतेला कोणताही अधिकार नव्हता. संस्थानिक ब्रिटिश नियंत्रणाखाली होते त्यामुळे ते ब्रिटिशांना मदत करणार होते अशी टीकाही केली जाते.

5)मध्यवर्ती कायदेमंडळातील कनिष्ठ सभागृहात सदस्यांची निवड अप्रत्यक्षरित्या होणार होती कोणत्याही लोकशाही राज्यात अशी तरतूद नाही

6)हिंदी लोकांनी सैन्याचे हिंदीकरण करण्याची मागणी केली होती, परंतु ब्रिटिशांनी सैन्याचे हिंदीकरण न करता ब्रिटिश शिपायांची व अधिकाऱ्यांची संख्या वाढविली.

7) कायदे मंडळातील सदस्य प्रादेशिक तत्त्वावर निवडले न जाता 1932 च्या जातीय निवाड्याप्रमाणे निवडले जाणार असल्याने, ते देशाच्या ऐक्यास मारक ठरणार होते.

8) प्रांतामध्ये स्वायतत्ता निर्माण केली असली तरी, कायदेमंडळाच्या अधिकारावर अनेक निर्बंध असल्याने प्रांतिक स्वायत्तता नावापुरतीच होती.

या कायद्याबाबत पंडित नेहरू म्हणतात," हा कायदा म्हणजे नियंत्रणे असलेले पण, इंजिन नसलेले यंत्र होय."

बंगाल प्रांताचे मुख्यमंत्री फजल उल हक म्हणतात." या कायद्याने देशात हिंदूंचे किंवा मुसलमानांचे राज्य निर्माण होणार नाही तर ब्रिटीशांचे राज्य सरकार निर्माण होईल."

**सारांश –**

1935 च्या कायद्याने भारताला घटनात्मक सुधारणा देण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केले. वास्तविक पाहता या कायद्याने ब्रिटिश सरकारचे वर्चस्व निर्माण झाले प्रांतिक स्वायत्तता नावापुरतीच राहिली या कायद्यानुसार भारतात निवडणुका झाल्या. काँग्रेसने आपले वर्चस्व सिद्ध करून दाखविले. भारतीय संविधान निर्मिती मध्ये या कायद्याला विशेष महत्त्व आहे. थोड्या फार बदलाने या कायद्यातील बहुतांश तरतुदी भारतीय संविधानामध्ये स्वीकारण्यात आल्या आहेत. प्रत्यक्षात कायदा अंमलात येण्यापूर्वीच अनेक प्रश्न निर्माण झाले होते. 1939 च्या दुसऱ्या महायुद्धामुळे या कायद्याची यशस्वी अंमलबजावणी झाली नाही. तसेच कायद्यामध्ये अनेक विसंगत बाबी असल्याने काँग्रेसने देखील याला विरोध दर्शविला होता.1935 चा कायद्याने संघ न्यायालय, प्रांतिक कायदेमंडळ,शासकीय खात्यांची विभागणी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया इत्यादी गोष्टी अस्तित्वात आल्या. काँग्रेसमध्ये फूट पाडण्याची सरकारी रणनीती ब्रिटिशांची या कायद्यामुळे स्पष्ट दिसून येते. वास्तविक सत्ता साम्राज्यवाद्यांच्या हाती होती. 1935 चा कायदा भारतीय स्वातंर्त्यलढयातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो.

**निष्कर्ष** – 1935 चा कायद्याने भारताच्या घटनात्मक इतिहासामध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले भारतीय संविधानामध्ये या कायद्यातील महत्त्वाच्या बाबींचा समावेश केल्याचे दिसून येते तसेच या कायद्यामुळेच भारतात 1937 साली सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. त्यात काँग्रेसला आठ प्रांतांमध्ये बहुमत मिळाले. संघ न्यायालय प्रांतिक कायदेमंडळ , द्विदल राज्यपद्धती, खाते विभागणी, सल्लागार मंडळ, मध्यवर्ती लोकसेवा आयोग इत्यादी गोष्टी या कायद्याने अस्तित्वात आल्या. भारतीय प्रांत व संस्थाने यांचे मिळून अखिल भारतीय संघराज्य स्थापन झाले. भारतामध्ये ब्रिटिश प्रभुत्व कायम ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणून हा कायदा करण्यात आला होता असे दिसून येते. प्रांतामध्ये स्वायतत्ता निर्माण केली असली तरी, कायदेमंडळाच्या अधिकारांवर अनेक निर्बंध घातले असल्याचे दिसून येते.1935 चा कायदा भारतीय स्वातंर्त्यलढयातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो.

**संदर्भ ग्रंथ सुची–**


1) डॉ धनंजय आचार्य, आधुनिक भारत,1750– 1950, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर जून 2006 पृष्ठ क्र. 339
2) Jatpalan N-'Constitutional History of India-Page no-99
3) डॉ. बी एन सरदेसाई , व्ही एन नलावडे आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन ,कोल्हापूर– 2004 पृष्ठ क्र 474
4) डॉ धनंजय आचार्य, आधुनिक भारत,1750– 1950, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर जून 2006 पृष्ठ क्र 371
5) उपरोक्त, पृष्ठ क्र 371
6)डॉ. बी एन सरदेसाई , व्ही एन नलावडे आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन ,कोल्हापूर– 2004 पृष्ठ क्र 475
7)डॉ धनंजय आचार्य, आधुनिक भारत,1750– 1950, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर जून 2006 पृष्ठ क्र 372
8)डॉ. बी एन सरदेसाई , व्ही एन नलावडे आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन ,कोल्हापूर– 2004 पृष्ठ क्र 477
9) पवार जयसिंगराव, तत्रैव, पान– 275 ते 280
10) डॉ धनंजय आचार्य, आधुनिक भारत,1750– 1950, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर जून 2006 पृष्ठ क्र 378 ते 380
11)डॉ. एम. पी. काळे इंडिया इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स, के सागर पब्लिकेशन, पुणे– 2003 पृष्ठ क्र 370,371